एक्सप्रेस इमारत व क्रिसेंट हाऊस या इमारतीच्या जागेच्या भूसंपादनाप्रकरणी अंदाजित मुल्यांकनानुसार <u>आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक :-काजादु-१११९/प्र.क्र.३०/नापु-१२
मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २० ऑगस्ट, २०१९.

<u>वाचा</u> : १. नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे क्रमांक : निशि/ निवास/ ९१/प्र.क्र.७३/(III)सात/जा.क्र.२९, दिनांक २४.१.२०१९ रोजीचे पत्र.
२. नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे क्रमांक : निशि/ निवास/९१/प्र.क्र.७३/(III)सात/जा.क्र.४३, दिनांक १३.२.२०१९ रोजीचे पत्र.
३. शासन निर्णय क्रमांक-काजादु-१११९/प्र.क्र.३०/नापु-१२ दि. १६.०२.२०१९
४. नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे क्रमांक : निशि/ निवास/ ९१/प्र.क्र.७३/(III)/क्रिसेंट भूसंपादन/सात/जा.क्र.११३, दिनांक १८.०४.२०१९ रोजीचे पत्र.
५. शासन निर्णय क्रमांक-काजादु-१११९/प्र.क्र.३०/नापु-१२ दि. ०८.०५.२०१९

<u>प्रस्तावना</u> :-

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, या कार्यालयासाठी क्रिसेंट हाऊस इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील ५७७.४७ चौ.मी. तसेच एक्सप्रेस इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील ३४५.१८ चौ.मी. जागेच्या भूसंपादनाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्याकरीता रुपये ६१,९७,८८,०८५/- (एकसष्ट कोटी सत्यान्नव लाख अठ्ठयाऐंशी हजार पंचाऐंशी फक्त) इतकी रक्कम उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मुंबई शहर यांच्या स्वीय प्रपंजी लेखा खात्यात जमा करण्यात आली होती.

सदर रक्कम तातडीने भरणे आवश्यक होते, त्याकरीता सदर रक्कम मागणी क्रमांक एम-४ मुख्य लेखाशीर्ष ४४०८ अन्न साठवण व वखार यावरील भांडवली खर्च, ०१ अन्न , १०१ प्रापण व पुरवठा, (०२) प्रापण वितरण व किंमत नियंत्रण, (०२) (०१) मुंबई शहर, खरेदीची किंमत (अनिवार्य) (४४०८ ००७७), २१-पुरवठा व सामग्री या लेखाशीर्षातून उक्त रक्कम अदा करण्यात आली होती. सदर रक्कमेची प्रतिपूर्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

१. वित्त विभागाने रुपये ६१,९७,८८,०००/-(एकसष्ट कोटी सत्यान्नव लाख अठ्ठयाऐंशी हजार फक्त) पुरवणी मागणीचा प्रस्ताव मान्य केलेला आहे. सदर पुरवणी मागणी मागणी क्र.एम-२ मुख्य लेखाशीर्ष २४०८ अन्न साठवण व वखार साठवण १०१, प्रापण व पुरवठा (०१) नागरी पुरवठा भारित (०१) (०१) मुंबई शहर (अनिवार्य) (२४०८ ००१९) १३- कार्यालयीन खर्च या लेखाशीर्षाखाली मंजूर करण्यात आलेला आहे.

२. सदर रक्कम मागणी क्रमांक एम-४ मुख्य लेखाशीर्ष ४४०८- अन्न, साठवण व वखार, (००) (०२) मुंबई शहर- भांडवली लेख्यावरील जमा व वसुली (अनिवार्य) (४४०८ ०१६६), ७०- वजा-वसुली या लेखाशीर्षात जमा करण्यास शासन मान्यता देत आहे.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ क्र. ७९/अर्थ १६ दिनांक १५.०६.२०१९ अन्वये दिलेल्या अभिप्रायानुसार निर्गमित करण्यात येत आहे. या आदेशानुसार रक्कम अदा करण्याची कार्यवाही वित्तीय सल्लागार व उप सचिव कार्यालयाच्या रोख शाखेकडून करण्यात यावी.

४. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१९०८२०११५६४१३९०६ क्रमांक असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Manojkumar Manikrao Suryawanshi

Digitally signed by Manojkumar Manikrao Suryawanshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supply and Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7f01fe9e39ec840cfd8aff420acfb85645316150fbe47d78667d211a870b6cad, serialNumber=171d531e2df977f0515a96704f71cb7e1b7622eae8ceb5547f27f39b9cdd96b0, cn=Manojkumar Manikrao Suryawanshi
Date: 2019.08.20 12:07:13 +05'30'

(मनोजकुमार सुर्यवंशी)
शासनाचे सहसचिव

प्रति,

१) नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई.
२) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाऊस फोर्ट, मुंबई ४०० ००१.
३) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अ.ना.पु.व ग्रा.सं.वि., जी.टी.हॉस्पीटल, मुंबई-४०० ००१.
४) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
५) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
६) अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई.
७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८) निवडनस्ती (ना.पु./१२)